

# प्रथमः पाठः ।
# १. सुभाषितमाला – १।

**विषयप्रवेश -**

- शब्दार्थ
- भाषांतर
- स्वाध्याय

## परिचय =

संस्कृत भाषेत सुभाषितांचे फार महत्त्व आहे. सुभाषिते अर्थपूर्ण व गोड, गेय असतात.

या सुभाषितमालेत पहिले सुभाषित गुरुविषयी पूज्यभाव दर्शवणारा श्लोक आहे. चारित्र्याचे महत्त्व, विद्या संपादनाचे महत्त्व, पुत्राचे कर्तव्य व सार्वजनिक प्रार्थना इ. विषयावर सुभाषिते आहेत. ही सुभाषिते विद्यार्थ्यांची आयुष्यभराची शिदोरी आहे.

## शब्दार्थ –

१) ब्रह्मन् = ब्रह्मदेव सृष्टीचे मूळ कारण, सर्वव्यापी चैतन्य
२) साक्षात् = प्रत्यक्ष
३) विदेशेषु = परदेशामध्ये
४) व्यसनेषु = संकटामध्ये
५) धर्म = पुण्य
६) वै = खात्रीने
७) पर्जन्य = पाऊस
८) क्षोभरहित = गैरव्यवस्था नसलेला
९) जलबिन्दु = पाण्याचा थेंब
१०) निपातेन = पडणे
११) घट = घागर
१२) पूर्यते = पूर्ण भरला जातो.
१३) हेतुः = कारण
१४) क्षमाशस्त्रम् = क्षमारुपी शस्त्र
१५) अतृणे = गवत नसलेल्या ठिकाणी
१६) उपशाम्यति = विझतो
१७) सस्य = धान्य
१८) सन्तु = होवोत

## भाषांतर

➢ **गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः।**
**गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः ॥१॥**



उत्तरः गुरु ब्रह्मदेव आहे, गुरु विष्णु आहे. गुरु महेश्वर आहे. गुरु प्रत्यक्ष परब्रह्म आहे. त्या श्रीगुरुंना माझा नमस्कार असो.

➢ **विदेशेषु धनं विद्या व्यसनेषु धनं मतिः।**
**परलोके धनं धर्मः शीलं सर्वत्र वै धनम्॥२॥**

उत्तरः परदेशामध्ये विद्या (हे) धन आहे. संकटामध्ये बद्धि (हे) धन आहे, परलोकामध्ये चांगले आचरण (हे) धन आहे. (आणि) सर्व ठिकाणी चारित्र्य हेच खात्रीने धन आहे.

➢ **जलबिन्दुनिपातेन क्रमश: पूर्यते घट:।**
**स हेतु: सर्वविद्यांना धर्मस्य च धनस्य च॥३॥**



उत्तर: पाण्याचा थेंब सतत पडत राहिल्यामुळे क्रमाक्रमाने घागर पूर्ण भरली जाते. सर्व प्रकारच्या विद्या, धर्म आणि धन यांच्या बाबतीत (संपादन करण्याच्या बाबत) हीच पद्धत आहे.

➢ **क्षमा शस्त्रं करे यस्य दुर्जन: किं करिष्यति।**
**अतृणे पतितो वह्नि: स्वयमेवोपशाम्यति॥४॥**

उत्तर: ज्याच्या हातात क्षमारुपी शस्त्र आहे, त्याला दुष्ट मनुष्य काय (इजा) करेल? गवत नसलेल्या ठिकाणी अग्नी पडला तर तो आपोआपच विझतो.

➢ **काले वर्षतु पर्जन्य: पृथिवी सस्यशालिनी।**
**देशोऽयं क्षोभरहित: सज्जना: सन्तु निर्भया: ॥५॥**



उत्तर: पाऊस योग्य वेळी पडो, पृथ्वी धान्यसंपन्न होवो. हा देश असंतोषरहित असू दे आणि सज्जन भयरहित होवोत.

## स्वाध्याय

**प्र. १ खालील मराठीतून प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**१) गुरुंचा गौरव कोणत्या शब्दात केला आहे?**

उत्तर: सुभाषितकाराने गुरुंना ब्रह्मा, विष्णु व शंकर यांचे स्थान दिलेले आहे. ब्रह्मदेवाने सृष्टीची निर्मिती केली, विष्णु सृष्टीचे पालन करतात व महेश या सृष्टीचे नियमन करतात. परब्रह्म हे या विश्वातील श्रेष्ठ प्रकारचे चैतन्यरुप तत्त्व आहे. सर्व ज्ञान देणाऱ्या गुरुंमध्ये ते सामावलेले आहे. असा गौरव केलेला आहे.

**२) सुभाषितकाराने कोणकोणत्या धनांचा उल्लेख केला आहे? त्यातील श्रेष्ठ धन कोणते?**

उत्तर: सुभाषितकाराने सुभाषितात एकुण चार धनांचा उल्लेख केला आहे. १) विद्या २) बुद्धी ३) चांगले आचरण ४) चारित्र्य ही होय. त्यापैकी चारित्र्य हे श्रेष्ठ धन होय.

**३) धन, धर्म आणि विद्या यांची वाढ कशी होते?**

उत्तर: जसे पाण्याचा एकेक थेंब घागरीत पडत राहिला तर हळुहळु घागर पाण्याने पूर्ण भरते त्याप्रमाणे सर्व प्रकारचे धन, विद्या व धर्म या गोष्टी सातत्याने प्रयत्न करत राहिल्यास हळुहळु वाढते.

**४) क्षमा गुणाचे महत्त्व कसे वर्णिले आहे?**

उत्तर: ज्याप्रमाणे गवत नसलेल्या जमिनीवर अग्नी पडला तर तो आपोआपच विझतो त्याप्रमाणे क्षमारुपी शस्त्र हातात असेल तर दुष्ट मनुष्य नमतो.

**५) 'काले वर्षतु' या श्लोकात कोणत्या इच्छा व्यक्त केल्या आहेत?**

उत्तर: 'काले वर्षतु' या श्लोकात सुभाषितकाराने पुढील इच्छा व्यक्त केल्या आहेत.
१) योग्य वेळी पाऊस पडवा.
२) पृथ्वी धान्याने समृद्ध व्हावी.
३) या देशाचे शासन व्यवस्थित असावे.
४) सज्जनांना कोणत्याही प्रकारची भीती असू नये.

**प्र. २ खालील प्रश्नांची संस्कृतमधून उत्तरे लिहा.**

**१) गुरु: साक्षात् क: इति वर्णित:?**

उत्तर: गुरु: साक्षात् 'परब्रह्म' इति वर्णित:।

**२) विदेशेषु, व्यसनेषु परलोके च धनं किम् वर्तते?**

उत्तर: विदेशेषु धनं विद्या, व्यसनेषु धनं मति:, परलोके च धनं शीलं वर्तते।

ज्ञानसागर अहमदनगर

**३) सर्वत्र किं धनम् अस्ति?**
उत्तर: शीलं सर्वत्र धनम् अस्ति।

**४) घट: कथं पूर्यते?**
उत्तर: घट: जलबिन्दुनिपातेन क्रमश: पूर्यते।

**५) कीदृश: वह्नि: स्वयम् एव उपशाम्यति?**
उत्तर: अतृणे स्थाने पतित: वह्नि: स्वयमेव उपशाम्यति।

**६) सज्जना: कीदृशा: सन्तु इति कवि: प्रार्थयते?**
उत्तर: सज्जना: निर्भया: सन्तु इति कवि: प्रार्थयते।

**प्र. ३ जोड्या लावा.**

| अ. | ब. |
|---|---|
| १. पृथिवी | अ) क्षोभरहित। |
| २. काले वर्षतु | ब) महेश्वर:। |
| ३. देशोऽयं | क) पर्जन्य:। |
| ४. गुरुर्देवो | ड) सस्यशालिनी। |

उत्तरे :
१) पृथिवी – सस्यशालिनी।
२) काले वर्षतु – पर्जन्य:।
३) देशोऽयं – क्षोभरहित।
४) गुरुर्देवो – महेश्वर:।

**प्र. ४ रुपे ओळखा.**

१) गुरवे = गुरु (उ – कारान्त पुलिंगी) नामाचे चतुर्थी एकवचन.
२) तस्मै = तद् या सर्वनामाचे पुलिंगी चतुर्थी एकवचन.
३) मति: = मति या इकारान्त स्त्रीलिंगी नामाचे प्रथमा एकवचन.
४) पृथिवी: = पृथिवी ईकारान्त स्त्रीलिंगी नामाचे प्रथमा एकवचन.
५) अयम् = इदम् या सर्वनामाचे पुलिंगी प्रथमा एकवचन.
६) करिष्यति = कृ (८ उभयपद) धातूचे परस्मैपदी द्वितीय भविष्यकाळ तृतीय पुरुष एकवचन.
७) पूर्यते = पूर १० उभयपद कर्मणि वर्तमानकाळ तृतीय पुरुष एकवचन.
८) उपशाम्यति= उप् + शम् ४ परस्मैपद वर्तमानकाळ तृतीय पुरुष एकवचन.
९) वर्षतु = वृष् – वर्ष् १ परस्मैपद आज्ञार्थ तृतीय पुरुष एकवचन.
१०) सन्तु = अस् २ परस्मैपद आज्ञार्थ तृतीय पुरुष बहुवचन.

**प्र. ५ संधी सोडवा.**

१) गुरुर्विष्णु: = गुरु: + विष्णु: ।
२) काश्चित् = क: + चित्।
३) आचार्यश्च = आचार्य: + च।
४) गुरुर्ब्रह्मा = गुरु: + ब्रह्मा।
५) स्वयमेवोपशाम्यति = स्वयम् + एव + उपशाम्यति।
६) देशोऽयं = देश: + अयम्।

**प्र. ६ समानार्थी संस्कृत शब्द लिहा.**

१) महेश्वर: = शम्भु:, ईश:, पशुपति:, शिव:, ईशान् शङ्कर:।
२) धनम् = द्रव्यम्, वित्तम्, द्रविणम्, अर्थ:।
३) मति: = धी:, बुद्धि:।
४) पृथिवी = पृथ्वी, धरा, धरणी, भू:, मही।
५) बुद्धिमान् = मतिमान्, सुधी:, सुज्ञ:, प्राज्ञ:।

**प्र. ७ विरुद्ध अर्थाचे संस्कृत शब्द लिहा.**

१) धर्म: ह्न अधर्म:
२) सज्जना: ह्न दुर्जना:
३) निर्भया: ह्न सभया:, भीता:।
४) गुरु: ह्न लघु:।
५) विदेश: ह्न स्वदेश:।
६) परलोके ह्न इहलोके।

**प्र. ८ सूचनेप्रमाणे सोडवा.**

**१) तस्मै श्री गुरवे नम:। (श्री गुरवे नम: जागी सरस्वती, मातृ व शारदा या शब्दांची रुपे घालून संस्कृत वाक्य लिहा.)**

उत्तर: तस्यै सरस्वत्यै नम:।
तस्यै मात्रे नम:।
तस्यै शारदाये नम:।

**२) सज्जना: सन्तु निर्भया:। (वाक्य एकवचनात लिहा.)**

उत्तर: सज्जन: निर्भय: अस्तु।

*****

ज्ञानसागर अहमदनगर